# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक ११९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in

सुधारित अधिसूचना
अतिरिक्त प्रवेश फेरीबाबत

जा.क्र.१०/एनजीपी/पदविका/अतिरिक्त फेरी/२०१८/९००९
दि. 20 AUG 2018

## Admission Notice for First Year Post S S C Diploma in Engineering & Technology Additional Round for academic year 2018-19

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तीन प्रवेश फे-या पूर्ण झालेल्या आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात क्र. ९०९०/२०१८ ही रिट याचिका दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेच्या संदर्भातील मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशाचे अनुषंगाने शासकीय, शासन अनुदानीत, विद्यापीठ विभाग संस्था व या फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक असलेल्या विनाअनुदानित प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थामधील रिक्त जागा भरण्यासाठी या अतिरिक्त फेरीचे आयोजन करण्यात आलेले आहे. या फेरीचे सुधारित वेळापत्रक खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

### Revised Notification of First Year of Post SSC Diploma in Engineering and Technology for Additional Round A.Y. 2018-19

| Sr. No. | Acitivity | Period |
|---|---|---|
| 1 | Institute to give the confirmation for participating in Additional Round (online mode) | 21.08.2018 to 22.08.2018 upto 5.00 p.m. |
| 2 | Display of Vacant Seats for Additional Round | 23.8.2018 |
| 3 | Online Submission and Confirmation of Option Form for Additional Round through candidates Login himself/herself | 24.08.2018 to 25.08.2018 |
| 5 | Display of Provisional Allotment of Additional Round | 27.08.2018 |
| 6 | ARC reporting (if First time Allotted) | 28.08.2018 |
| 7 | Reporting to the Allotted institute and confirmation of Admission | 29.08.2018 to 30.08.2018 |
| 8 | Cut-off Date for all type of admission for the Academic Year 2018-19 | 31.08.2018 |
| 9 | For institutes: Last date of uploading the data (details of admitted candidates) | 31.08.2018 |

प्रवेश फेरीसंबंधी महत्वाच्या सूचना.

१. शासनमान्य प्रवेश नियमावलीनुसार या अतिरिक्त प्रवेश फेरीसाठी प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी **अंतिम गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट** असलेले सर्व उमेदवार प्रवेशासाठी पात्र असतील.

२. या फेरीसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय, शासन अनुदानीत व विद्यापीठ विभाग या फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक असलेल्या विना अनुदानित प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थामधील रिक्त जागांची माहिती संचालनालयाच्या प्रवेशाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३. अतिरिक्त फेरीमध्ये भाग घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी वर नमुद तक्त्यातील कालावधीत ऑनलाईन पध्दतीने विकल्प अर्ज भरणे आवश्यक आहे.

४. अतिरिक्त फेरीमध्ये जागेचे वाटप झाल्यास अशा उमेदवारांचा त्यापूर्वीच्या फे-यांमध्ये मिळालेला शासकीय, शासन अनुदानीत ,विद्यापीठ विभाग संस्था व या फेरीमधील सहभागी विना अनुदानित प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थामधील प्रवेश आपोआप रद्द होईल व अशा रद्द झालेल्या जागेवर उमेदवाराचा कोणत्याही प्रकारे हक्क असणार नाही.

५. अतिरिक्त फेरीमध्ये जागेचे वाटप झालेल्या उमेदवारास त्यापूर्वीच्या फे-यांमध्ये मिळालेला प्रवेश हा या फेरीमध्ये सहभागी नसलेल्या विनाअनुदानीत प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील असेल तर अशा विनाअनुदानीत प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही उमेदवाराने स्वत: करणे आवश्यक आहे.

६. अतिरिक्त फेरीमध्ये प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी विहीत मुदतीमध्ये जागेचे वाटप झालेल्या प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थेमध्ये प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. अन्यथा सदरच्या जागेवर उमेदवार प्रवेशास पात्र असणार नाही.

( डॉ. अभय वाघ )
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत-मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर
प्रत-माहीती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, मुंबई, पुणे
२) प्राचार्य/संचालक, प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या सर्व विनाअनुदानित संस्था
३) कार्यासन क्र. ३ मुख्य कार्यालय, मुंबई

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


सुधारित अधिसूचना
अतिरिक्त प्रवेश फेरीबाबत

जा.क्र.१०/एनजीपी/पदविका/अतिरिक्त फेरी/२०१८/ ७०७८
दि. 20 AUG

## Admission Notice for First Year Post H S C Diploma in Pharmacy Additional Round for academic year 2018-19

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तीन प्रवेश फे-या पूर्ण झालेल्या आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात ९१६५/२०१८ ही रिट याचिका दाखल करण्यात आली होती. सदरील याचिकेच्या संदर्भातील मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशाचे अनुषंगाने शासकीय, शासन अनुदानीत संस्था व या फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक असलेल्या विनाअनुदानित प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थामधील रिक्त जागा भरण्यासाठी या अतिरिक्त फेरीचे आयोजन करण्यात आलेले आहे. या फेरीचे सुधारित वेळापत्रक खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

### Revised Notification of First Year of Post HSC Diploma in Pharmacy for Additional Round A.Y. 2018-19

| Sr. No. | Acitivity | Period |
|---|---|---|
| 1 | Institute to give the confirmation for participating in Additional Round (online mode) | 21.08.2018 to 22.08.2018 upto 5.00 p.m. |
| 2 | Display of Vacant Seats for Additional Round | 23.8.2018 |
| 3 | Online Submission and Confirmation of Option Form for Additional Round through candidates Login himself/herself | 24.08.2018 to 25.08.2018 |
| 5 | Display of Provisional Allotment of Additional Round | 27.08.2018 |
| 6 | ARC reporting (if First time Allotted) | 28.08.2018 |
| 7 | Reporting to the Allotted institute and confirmation of Admission | 29.08.2018 to 30.08.2018 |
| 8 | Cut-off Date for all type of admission for the Academic Year 2018-19 | 31.08.2018 |
| 9 | For institutes: Last date of uploading the data (details of admitted candidates) | 31.08.2018 |

29 AUG 2018

प्रवेश फेरीसंबंधी महत्वाच्या सूचना.

१. शासनमान्य प्रवेश नियमावलीनुसार या अतिरिक्त प्रवेश फेरीसाठी प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी **अंतिम गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट** असलेले सर्व उमेदवार प्रवेशासाठी पात्र असतील.

२. या फेरीसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय, शासन अनुदानीत या फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक असलेल्या विनाअनुदानित प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थामधील रिक्त जागांची माहिती या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३. अतिरिक्त फेरीमध्ये भाग घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी वर नमुद तक्त्यातील कालावधीत ऑनलाईन पध्दतीने विकल्प अर्ज भरणे आवश्यक आहे.

४. अतिरिक्त फेरीमध्ये जागेचे वाटप झाल्यास अशा उमेदवारांचा त्यापूर्वीच्या फे-यांमध्ये मिळालेला शासकीय, शासन अनुदानीत ,विद्यापीठ विभाग संस्था व या फेरीमधील सहभागी विनाअनुदानित प्रथम वर्ष पदविका

औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थामधील प्रवेश आपोआप रद्द होईल व अशा रद्द झालेल्या जागेवर उमेदवाराचा कोणत्याही प्रकारे हक्क असणार नाही.

५. अतिरिक्त फेरीमध्ये जागेचे वाटप झालेल्या उमेदवारास त्यापूर्वीच्या फे-यांमध्ये मिळालेला प्रवेश हा या फेरीमध्ये सहभागी नसलेल्या विनाअनुदानीत प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेतील असेल तर अशा विनाअनुदानीत प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेतील प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही उमेदवाराने स्वत: करणे आवश्यक आहे.

६. अतिरिक्त फेरीमध्ये प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी विहीत मुदतीमध्ये जागेचे वाटप झालेल्या प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेमध्ये प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. अन्यथा सदरच्या जागेवर उमेदवार प्रवेशास पात्र असणार नाही.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत-मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर

प्रत-माहीती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, मुंबई, पुणे

२) प्राचार्य/संचालक, प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या सर्व विनाअनुदानित संस्था

३) कार्यासन क्र. ३ मुख्य कार्यालय, मुंबई